"दयानंद कला महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाची मातोश्री वृध्दाश्रमास भेट"

दि. 13.09.2019

लातूर- आज दि. 13.09.2019 रोजी महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागातर्फे समाजशास्त्राच्या

विद्याथ्र्यांनी मातोश्रीवृध्दाश्रमाला भेट दिली. विद्याथ्र्यांना समाजातील निराधार वृद्धांचे दु:ख समजावे आणि भविष्यात वृध्दांची समस्या कमी व्हावी या दृष्टीकोनातून वर्गखोलीच्या बाहेर जाऊन समाजशिक्षणाचे उदिष्ट या भेटी मागे होते.

वृध्दाश्रम भेटी दरम्यान वृध्दाश्रमातील वृद्धांशी संवाद साधण्यात आला. विद्याथ्र्यांनी वृध्दांच्या समस्या समजून घेतल्या. 'वृध्दांचे समुपदेशन ' या विषयावर प्रसिध्द सामाजीक कार्यकत्र्या श्रीमती सविता कुलकर्णी व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अंजली जोशी यांनी विद्याथ्र्यांना मार्गदर्शन केले. वृध्दाश्रमाची सर्व व्यवस्था सांभाळणारे डॉ. देवधर काका यांनीही सर्वांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी समाजशास्त्र विषयाचे 38 विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस.पी. गायकवाड सर तसेच डॉ. लीला कर्वा यांचे विशेष सहकार्य लाभले.